गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष २ रे ● अंक १०७ वा ● मंगळवार ०३ सप्टेंबर २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 107 | Date : 03/08/2024 | blow Tuesday | Page 4 Price 4


## उजनीचे पाणी हरणा नदीत पोहोचल्याने येत्या दोन दिवसात कुरनूर धरणात येणार, शेतकऱ्यात आनंद

# विधानसभा निवडणुकीत जाहीरनाम्यात दिलेले वचननामा आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी पूर्ण केले

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधीः आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी गत विधानसभा निवडणुकीत उजनीचे पाणी अक्कलकोट तालुक्यांना मिळवून देऊ अशी ग्वाही दिल्याप्रमाणे अखेर उजनीचे पाणी हरणा नदीत पोहोचल्याने येत्या दोन दिवसात कुरनूर धरणात पोहोचणार असल्याने अक्कलकोट तालुका वासियातून समाधान व्यक्त होत आहे. दरम्यान दर्गनहळी कुंडातून दक्षिण सोलापूर तालुक्यातील विविध तलाव भरून घेण्यात आले. दिनांक १ सप्टेंबर नंतर जलसंपदा विभागाच्या नियोजनानुसार दर्गनहळली वितरण कुंडातून नदीकडे उजनी धरणातील पाणी सोडण्यात आले आहे. एक टीएमसी पाण्यातच एकरूप उपसा सिंचन योजनेतील सर्व तलावासह भरून होणार आहे. त्यामुळे एक टीएमसी पेक्षा कमी पाणी धरणात सोडण्यात येणार





आहे. कुरनूर धरणाची पाणी साठवून क्षमता ०.८२ टीएमसी असून या खालील सिंचन क्षेत्र दहा हजार एकशे दहा हेक्टर असून सध्याचे स्थिती पाहता ३६ टक्के होऊन अधिक पाणीसाठा उजनी धरणात आहे धरणाच्या खालील बंधाऱ्यची एकूण आठ आठ बंधारे असून यावर ५१ गावांची लिस्ट आहे धरणाला नऊ दरवाजे असून बोलणे हरणा नदीच्या संगमावर धरण असून उजनी ते करून धरण २२६ किलोमीटर अंतर पार करून पाणी करून धरणात पोहोचणार आहे. पाण्याच्या प्रवाहानुसार कुरुल धरणात पाणी येत्या दोन दिवसात पोहोचणार आहे. उजनीचे पाणी अक्कलकोट तालुक्याला मिळण्यासाठी गेल्या अनेक वर्षाची प्रतीक्षा संपणार असून आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी गत विधानसभा निवडणुकीत दिलेली वचनपूर्तीच म्हणावी लागणार आहे. गेली वीस वर्षे तालुक्याचे राजकारणात उजनी धरणाच्या पाण्यावर अवलंबून असणाऱ्या कुरनूर धरणाभोवती फिरत होते. या कामे राज्याचे मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस, ना. अजित पवार, पालकमंत्री । **पान २ वर**

## कुलस्वामिनी तुळजाभवानी मंदिरात बैलपोळा सण उत्साहात

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

तुळजापूर/प्रतिनिधीः : दरवर्षीप्रमाणे यंदाही महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीच्या मंदिरात मोठ्या उत्साहात बैलपोळा सण साजरा करण्यात आला. तुळजाभवानी मातेच्या मंदीरातील मठाचे बैल कमानवेस येथील मारूती मंदीरापासून वाजत-गाजत मंदिरात आणण्यात आले. बैलांना पुरणपोळीचा नैवेद्य देऊन तुळजाभवानी मंदीरात मुख्य गाभाऱ्यासमोर बैलांची पुजा करण्यात आली.तुळजापूर शहरत बैलपोळा सण पारंपरिक पद्धतीने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. डुल्या मारुती मंदिरात देवीचे महंत तुकोजीबुवा व चिलोजीबुवा तसेच भोपेपुजारी पाटील यांचे मानाचे बैल आल्यावर त्यांना सजविण्यात आले. पूजन झाल्यानंतर वाजत- गाजत बैलांना तुळजाभवानी मंदिरात आणण्यात आले. मंदिरात बैलांचे पारंपारिक पद्धतीने तुळजाभवानी देवीच्या गाभाऱ्यात नेऊन पूजन करण्यात आले. बैलांना देवीचे दर्शन घालून झाल्यानंतर महंत व पुजारी बांधवांनी बैलाचे पूजन केले. त्यानंतर बैलांना पुरणपोळीचा नैवेद्य दाखविला. वाजत गाजत बैल मठाकडे रवाना झाले. यावेळी महंत तुकोजीबुवा, महंत महंत हमरोजीबुवा, व्यवस्थापक तहसीलदार माया माने, धार्मिक व्यवस्थापक सिद्धेश्र्वर इंतुले, मंदिर कर्मचारी गणेश गायकवाड, दोन्ही मठाचे सेवक, पुजारी, सेवेकरी प्रथमेश औटी, भाविक व कर्मचारी उपस्थित होते. शहरात देखील शेतकऱ्यांनी आपली बैल मारुती मंदिरात आणून त्याचे पूजन करून त्यांना नैवेद्य दाखवू शहरात त्यांची वाजत गाजत मिरवणूक काढत पारंपारिक पद्धतीने मोठ्या उत्साहात पोळा सन साजरा केला.

## मुंबई-इंदूर नवीन रेल्वे मार्ग प्रकल्पाला मंजुरी ;केंद्रीय मंत्रिमंडळाचा निर्णय

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

नवी दिल्ली: मुंबई आणि इंदूर या दोन प्रमुख व्यावसायिक केंद्रांना जोडणाऱ्या ३०९ किलोमीटर लांबीच्या नव्या रेल्वे मार्ग प्रकल्पाला केंद्रीय मंत्रिमंडळाने आज मंजुरी दिली. या प्रकल्पामुळे महाराष्ट्रातील दोन आणि मध्य प्रदेशातील चार जिल्ह्यांना रेल्वेसेवेने जोडले जाईल, ज्यामुळे या भागातील व्यापार वाढेल.या प्रकल्पाचा एकूण खर्च रुपये १८ हजार ०३६ कोटी असून, तो सन २०२८-२९ पर्यंत पूर्ण होईल. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रिमंडळाच्या आर्थिक व्यवहार समितीने (सीसीईए) रेल्वे मंत्रालयाच्या अंतर्गत नवीन रेल्वे मार्ग प्रकल्पाला आज मंजुरी दिली. ह्या प्रकल्पाद्वारे मनमाड-इंदूर च्या प्रस्तावित नवीन व लहान रेल्वेमार्गाने दोन्ही राज्यांमध्ये व्यापार आणि वाणिज्य क्षेत्रात आमूलाग्र बदल होतील. तसेच याद्वारे प्रधानमंत्री श्री. मोदी यांची 'नव भारत' ची संकल्पना पूर्ण होण्यास मदत होईल आणि रोजगार/ स्वयंरोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होतील.




हा प्रकल्प मल्टी-मोडल कनेक्टिव्हिटीसाठी पीएम-गती शक्ती राष्ट्रीय मास्टर प्लॅनची फलश्रुती असून, जे एकात्मिक नियोजनाद्वारे शक्य झाले आहे तसेच या प्रकल्पाद्वारे नागरिकांना, वस्तू आणि सेवांच्या वाहतुकीसाठी अखंड कनेक्टिव्हिटी उपलब्ध होईल.

महाराष्ट्र आणि मध्य प्रदेश या दोन राज्यांमधील या प्रकल्पाअंतर्गत सहा जिल्ह्यांचा समावेश असेल आणि भारतीय रेल्वेच्या सध्याच्या जाळ्यामध्ये सुमारे ३०९ किलोमीटरची भरही पडेल. या प्रकल्पामुळे ३० नवीन स्थानके बांधली जातील. नवीन रेल्वे मार्ग प्रकल्पामुळे सुमारे १,००० गावे आणि सुमारे ३० लाख लोकसंख्येला जोडली जाऊ शकतील.या प्रकल्पामुळे देशाच्या पश्चिम/नैऋत्य भागाला मध्य भारताशी जोडणारा एक लहान मार्ग उपलब्ध करून देऊन या प्रदेशातील । **पान २ वर**

## कृषिक्षेत्रासाठी १४ हजार कोटींच्या खर्चास केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

नवी दिल्ली : केंद्रातील मोदी सरकारने शेतकऱ्यांसाठी मोठा निर्णय घेतला आहे. सरकारने कृषिक्षेत्रासाठी एकूण १४ हजार कोटी रुपयांच्या खर्चास मंजुरी दिली आहे. यामध्ये पीक विज्ञान आणि डिजीटल कृषी मिशन योजनांचाही समावेश आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी यासंदर्भात माहिती दिली आहे. मोदी सरकारने घेतलेल्या या निर्णयामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल, अशा विश्र्वासही त्यांनी व्यक्त केला आहे. अश्विनी वैष्णव यांनी दिलेल्या माहितीनुसार, केंद्रीय मंत्रिमंडळाने आज शेतकऱ्यांसाठी सात मोठे निर्णय घेतले आहेत. सरकारने डिजिटल कृषी मिशनसाठी २ हजार ८१७ कोटी रुपयांच्या खर्चाला मंजुरी दिली आहे. तसेच पीक विज्ञान योजनेसाठी ३ हजार ९७९ कोटी रुपयांच्या खर्चालाही मंजुरी देण्यात आली आहे. याशिवाय शाश्र्वत पशुधन आरोग्यासाठी १ हजार ७०२ कोटी रुपये, फलोत्पादन विकासासाठी ८६० कोटी रुपये, कृषी शिक्षणासाठी २ हजार २९१ कोटी रपये, आणि कृषी । **पान २ वर**



## 'तिरुपती'च्या प्रसादासाठी आधार कार्ड बंधनकारक



**दैनिक यशसिद्धी न्युज**

हैदराबाद : देशातील सर्वांत श्रीमंत देवस्थान अशी ओळख असलेल्या आंध्र प्रदेशातील तिरुमला तिरुपती देवस्थानने व्यंकटेश्वर मंदिरामध्ये प्रसाद म्हणून लाडू घेण्यासाठी भाविकांना आधार कार्ड अनिवार्य केले आहे. देवस्थानचे ट्रस्टचे अतिरिक्त कार्यकारी अधिकारी व्यंकय्या चौधरी यांनी ही माहिती दिली. चौधरी म्हणाले, काही दलाल मंडळी हे प्रसादाचे लाडू चढ्या भावाने भाविकांना विकत असल्याच्या तक्रारी । **पान २ वर**







## संपादकीय

### माणसांचे भविष्य ठरविते..

विज्ञानावर असलेल्या लोकांच्या विश्वासाचा गैरफायदा घेत भ्रामक विज्ञान लोकांची फसवणूक करत असते. लोकांच्या आरोग्याशी, भावनांशी खेळतानाच आर्थिक शोषणही केले जाते. म्हणूनच फसव्या विज्ञानाचे हे सोंग ओळखणे आवश्यक आहे. मात्र, यासाठी पारखणे, पडताळणी करणे आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे गरजेचे आहे. फसवे विज्ञान हे खऱ्या विज्ञानाचे एक सोंग असते. त्याला 'फसवे विज्ञान' वा 'भ्रामक विज्ञान' असेही म्हणता येईल. या भ्रामक विज्ञानाचे एक उदाहरण प्रसिध्द आहे. २००० साली चेन्नई येथील रामन पिल्लई नावाच्या व्यक्तीने आपण शास्त्रज्ञ असल्याचा आव आणून आपल्याला पाण्यापासून डिझेल बनविण्याची एक पध्दत अवगत आहे, असा दावा केला होता. आय. आय.टी. मधील तज्ज्ञांनी केलेल्या चाचणीत त्याची फसवाफसवी उघडकीस आली. पाणी ढवळण्यासाठी पिल्लई जो दांडा वापरत होता तो पोकळ होता. त्यात थोडे डिझेल आधीच भरून घेऊन तो ते अलगद पाण्यात मिसळत असे. पुढे सीबीआयने त्याची चौकशी केली आणि आपण फसवाफसवी करीत असल्याचे त्याने कबूल केले. विज्ञानात गृहीतक, अनुमान, प्रयोग, प्रचिती, पुन्हा पुन्हा पडताळणी आणि प्रचिती अशा पायऱ्या असतात. त्यानंतरच निष्कर्ष काढला जातो. नवीन पुरावे मिळाले तर आधीच्या निष्कर्षात योग्य तो बदल केला जातो. त्याच्या मर्यादा मान्य केल्या जातात. स्थापत्यशास्त्राशी नाते सांगणारे फसवे वास्तुशास्त्र सध्या खूपच लोकप्रिय होत आहे. त्यात आग्नेय दिशेला अग्नी म्हणजे शेगडी, चूल असावी तर पश्चिम दिशेला वेस्टपेपर बास्केट असावे म्हणजे घरात समृध्दी नांदेल, असे हास्यास्पद दावे केले जातात. लोक अशा फसव्या छद्म विज्ञानाच्या मागे का जातात, तेही पाहिले पाहिजे. माणूस हा उपजतच एक भावनाशील प्राणी आहे. कशावर तरी श्रध्दा ठेवावी, अशी त्याची मानसिकता असते. प्रश्न विचारणे, खरे-खोटे पारखणे या गोष्टी त्याला शिकवाव्या लागतात. सतराव्या शतकाच्या सुरुवातीला विज्ञानाचा उदय झाल्यावर विविध प्रकारच्या ऊर्जांचा शोध लागला. जेम्स वॅट यांचा वाफेच्या ऊर्जेचा शोध प्रसिध्द आहे. अणू ऊर्जा, सूर्य ऊर्जा, आघातातून निर्माण होणारी ध्वनी ऊर्जा अशा विविध ऊर्जा भौतिक शास्त्रात अभ्यासल्या जातात. या ऊर्जा मोजण्याची शास्त्रीय एकके असतात. जसे ध्वनी ऊर्जा ही डेसिबल्समध्ये तर विद्युत शक्ती वॉटस्‌मध्ये मोजतात. परंतु छद्म विज्ञानामध्ये मंगळ, शनी अशा ग्रह गोलांपासून वैश्विक ऊर्जा निघते आणि ती निवडक माणसांचे भविष्य ठरविते,

पान १ वरुन

### उजनीचे पाणी हरणा नदीत पोहोचल्यान

ना. चंद्रकांत पाटील यांच्याकडे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी या पाण्याबाबत वेळोवेळी पाठपुरावा केल्याने सदरचे यश मिळाले आहे.

एकरूप प्रकल्पाचे भूमिपूजन भूमिपूजन दर्गनहळी येथे तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले होते गेल्या ३० वर्षापासून शासकीय निधी उपलब्ध नसणे लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय यंत्रणेची उदासीनता आणि महाराष्ट्रातील सत्तांतर आदी अनेक कारणामुळे हा अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प रखडला होता. सन २०२१ मध्ये एकरूख सिंचन योजनेची चाचणी घेण्यात आली होती दक्षिण आणि अक्कलकोट तालुक्यातील शेतकऱ्यांना उजणीचे हक्काचे पाणी मिळावे यासाठी शेतकऱ्यांनी उपोषण अस्त्र उगारले. तीस वर्षांपूर्वी या प्रकल्पाचा खर्च २४ कोटी इतका होता शासनाच्या वेळ काढू पणामुळे या योजनेचा खर्च साधारणपणे २५० कोटीच्या घरात गेला आहे. अक्कलकोट व आणि दक्षिण सोलापूर तालुक्यातील अनेक आमदार बदलले पाणी प्रश्न मिटला नव्हता तालुक्यातील सर्वपक्षीय राजकीय नेत्यांनी या योजनेवर मते मिळविली सध्या समाज माध्यमातून अक्कलककोट दक्षिण तालुक्यातील गावांसाठी एकरूप योजनेची पाणी येण्याचे पाणी कोणी आणले यावरून वाक्य युद्ध सुरू आहे एकरूप सिंचन योजनेच्या माध्यमातून मिळणाऱ्या पाण्यामुळे तालुक्यातील बागायती क्षेत्र क्षेत्रात वाढ होण्यास मदत होणार आहे शेतकऱ्याची आर्थिक स्थिती दिलासात्मक होऊन जीवनमान उंचावणार आहे.

याकरिता आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केलेले प्रयत्न फलदायी ठरलेले असून तालुक्याच्या शेवटच्या टोकापर्यंत उजनीचे पाणी पोहचणार आहे.

गेल्या पाच वर्षात राज्याच्या अर्थसंकल्पामध्ये आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी या योजनेला भरीव निधी मिळविल्याने सदरची योजना पूर्ण होऊन अखेर उजनीचे पाणी अक्कलकोट तालुक्यास मिळण्यास मोठी मदत झाली आहे. दक्षिण सोलापूर तालुक्यातील २१ आणि अक्कलकोट तालुक्यातील ५१ गावे अशा ७२ गावे उजनीच्या पाण्यापासून वंचित होती या गावातील एकूण १७३१० हेक्टर क्षेत्राच्या सिंचनासाठी एकरूप उपसा सिंचन योजना पूर्ण होणे काळाची गरज होती. दरम्यान सन २०१९ सालच्या अक्कलकोट विधानसभा निवडणुकीत काही गावांनी या प्रश्नावर शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मतदानावर बहिष्कार घालण्याची भूमिका घ्यावी लागली होती. आमदार सचिन कल्याण शेट्टी यांनी वेळोवेळी पाठपुरावा केल्याने सदरची योजना पूर्ण होण्यास मोठी मदत झाली आहे. एकरूप योजना पूर्ण होऊनही उजनी डावा कालवा शाखेतील सोडलेले पाणी पुढे कारंबा शाखेनंतर एकरूप तलावापर्यंत पोहोचण्यास अडथळा निर्माण झाला होता. उजनी धरणाची निर्मिती होऊन ४५ वर्षे झाली अक्कलकोट तालुक्याला हक्काचे पाणी मिळणार असून यामुळे हरितक्रांती धवलक्रांती होऊन अर्थक्रांतीत आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या प्रयत्नामुळे योगदान मिळणार आहे.

# विधानसभेची तुतारी आपणच फुंकणार : सुभाष भोसले

## मंगळवेढ्यात पत्रकार परिषदेत केली घोषणा

**दैनिक यशसिद्धी न्युज**




पंढरपूर/प्रतिनिधी : राष्ट्रीय नेते शरद पवार यांच्या वरील गेल्या ४० वर्षाच्या असलेल्या निष्ठेमुळे येणाऱ्या विधानसभेसाठी शरद पवार यांच्या पक्षातूनच निवडणूक लढवणार असून विधानसभेची तुतारी आपणच ठोकणार असल्याची पंढरपूरची माजी नगराध्यक्ष सुभाष भोसले यांनी मंगळवेढा येथील राष्ट्रवादी शरदचंद्रजी पवार पक्षाच्या कार्यालयात आयोजित केलेल्या पत्रकार परिषद स्पष्ट केले

दरम्यान पंढरपूरचे माजी नगराध्यक्ष सुभाष भोसले हे शरद पवार यांच्याशी गेली ४० वर्षांपूर्वी निष्ठेचे राजकारण करणारी पंढरपूरचे निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून सुभाष भोसले यांची ओळख आहे. मुस्लिम मनाली की आपण नगराध्यक्ष असताना पवार यांच्या माध्यमातून पंढरपूरच्या व्यापाऱ्यांना अनुदान देण्याची भूमिका असो अथवा पंढरपूर शहराच्या धार्मिक विकासासाठी पवार यांनी आतापर्यंत पंढरपूरचे झोपते माप दिल्याने त्यांनी सांगितले गेल्या ४० वर्षापासून आपण पवार यांना काहीही मागितले नाही निष्ठेची फळ म्हणून आपण विधानसभेचे उमेदवारी मागत आहोत पवार यांना सोडून गेलेले अनेक वातावरण येथे लक्षात घेता

त्यांच्या पडत्या काळामध्ये आम्ही निष्ठेने राहिलेलो ही आमची जबाबदारी होती असेही त्यांनी स्पष्ट केले यापूर्वी मला १९८५ स*** पवार यांनी पक्षाची तिकीट दिलेली होती मात्र मी मोठ्या मनाने सुधाकरपंत परिचारक यांचे नाव सुचवल्याने त्यांना उमेदवारी दिली आज देशांमध्ये आणि महाराष्ट्रामध्ये जनता बीजेपी व माहितीचे विरुद्ध असल्याची स्थिती असल्याने मी पक्षाबरोबर आहे आजही काही उमेदवार लक्ष्मीचे उपासक आहेत मात्र मी सरस्वतीचा उपासक आहे विकासाच्या जाहीरनामा शरदचंद्र पवार हे काढतील त्याप्रमाणे त्यांची पुढील कार्यवाही होईल मात्र आज हजारो कोटींच्या विकास निधीच्या व लग्न केल्या जात आहेत मात्र एवढ्या कोटींची तरतूद अर्थसंकल्पात आहे का? हाही संशोधनाचा विषय आहे एका आमदाराला किती निधी देता येतो ही अर्थसंकलमध्ये निश्र्चित असते मात्र जाहीर करणे आणि प्रत्यक्ष निधी खर्च होणे व दोन दोन टोकाच्या बाबी आहेत लाडकी बहीण किंवा पदवीधर तरुण यांना दाखवली जाणारी आम्ही हे वाऱ्यासमान आहेत तसेच त्यांनी असेही त्यावेळी स्पष्ट केले आहे काशिगाव येथे ५४ एकरामध्ये होत असलेली एमआयडीसी ही काल्पनिक असून हायवे शेजारी असणाऱ्या या जमिनीची किंमत कोट्यावधी रुपये जासून शेतकऱ्यांना त्याचा मोबदला मिळणार का? एवढ्या छोट्या जागेमध्ये उद्योगधंदे कार्यालय होणार का? एमआयडीसी मंजूर होण्यासाठी कमीत कमी १०० एकरापेक्षा जास्त जमीन अपेक्षित असताना असे एमआयडीसी होणे कपूर कपूर कपलिक आहे असेही त्यांनी यावेळी सांगितले आपण मी जरी शहरांमध्ये असलो तरी ग्रामीण भागातील कार्यकर्ता आहे त्यामुळे ग्रामीण भागातील जनता ही माझ्या पाठीशी राहिली याबद्दल त्यांनी ठामपणे सांगितले शेवटी आपण पवारांच्या पक्षातून तुतारी फोकणार असल्याची स्पष्ट केली

# शिर्डी पोलीसांनी साईभक्ताचे गहाळ झालेल्या सोन्याच्या दागिन्यांचा अवघ्या दोन तासामध्ये लावला तपास




**दैनिक यशसिद्धी न्युज**

शिर्डी : अडबाला विरा वेंकटा रा. आंध्रप्रदेश हे त्यांचे पत्नीसह श्री साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डी येथे आलेले होते. दर्शनकरून ते दिनांक ३१/०८/२०२४ रोजी खाजगी स्विफ्ट डिझायर गाडीने काकडी विमानतळाकडे गेले असता विमानामध्ये बसल्यानंतर २,७०,००० रूपये किमतीचे सोन्याचे दागिने व ए.टी.एम. कार्ड असलेले पर्स हे सदर स्विफ्ट डिझायर गाडीमध्ये विसरून गेल्याचे त्यांचे लक्षात आले. परंतु सदर गाडीचे मालक, गाडी नंबर/मोबाईल नंबर नसल्यामुळे ते पुर्णपणे गोंधळुन गेले होते. ते दिनांक ०१/०९/२०२४ रोजी पुन्हा शिर्डी पोलीस स्टेशनला येवुन सदर घटनेबाबत पोलीसांना माहिती कळविल्याने उपविभागीय पोलीस अधिकारी शिर्डी श्री शिरीष वमने यांचे मार्गदर्शनाखाली शिर्डी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री रामकृष्ण कुंभार यांनी सुचना देवुन तात्काळ तपासकामी सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री भारत बलैय्या, पोलीस कॉन्स्टेबल गणेश घुले, पोलीस कॉन्स्टेबल प्रसाद गोरे यांचे पथक नेमले व त्यांनी काकडी विमानतळावरून व अन्य ठिकाणीवरून सदर गाडीचे सी.सी.टि.व्ही. फुटेजद्वारे गाडीचा नंबर प्राप्त करून सदर गाडीचालकाचा शोध घेतला. सदर गाडीचालकास शिर्डी पोलीस स्टेशन येथे बोलावुन त्यास घटने बाबत विचारपुस केली परंतु पर्स गाडीमध्ये राहीलेबाबत त्यांना काहीएक माहिती नसल्याचे सांगितल्याने त्यांचे गाडीमध्ये पर्सचा शोध घेतला असता ती सीटच्या खाली पडलेली मिळुन आली. सदरचे दागिने असलेली पर्स ही तात्काळ महिला तक्रारदार यांचे ताब्यात देण्यात आले. त्यावेळी सदर साईभक्त यांनी शिर्डी पोलीस स्टेशनचे अधिकारी व अंमलदार यांचे आभार मानले

# पंढरपुरात ज्येष्ठ विधीज्ञांचा मनसेच्या वतीने दिलीप बापू धोत्रे यांच्या हस्ते गौरव संपन्न

**दैनिक यशसिद्धी न्युज**

पंढरपूर/प्रतिनिधी :पंढरपूर जिल्हा व सत्र न्यायालयात गेली अनेक वर्ष वकिली सेवा बजावून लोकांना न्याय मिळवून देण्याची




पवित्र काम करणाऱ्या पंढरपूर येथील जेष्ठ विधीज्ञांचा सहकुटुंब गौरव व सन्मान महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने मनसेनेतील दिलीप बापू धोत्रे यांच्या शुभहस्ते करण्यात आला. कार्यक्रम प्रसंगी वकील बंधू शी संवाद साधताना दिलीप बापू धोत्रे यांनी सुरुवातीला सर्व विधीज्ञांचे आभार मानून आपला परिचय करून देताना शालेय जीवनापासून आतापर्यंतचा राजकीय प्रवासाला उजाळा देत वकील बंधूंच्या प्रलंबित असलेल्या मागण्या पूर्ण करण्याचा विश्र्वासही दिला

यावेळी मनसेने ते दिलीप बापू धोत्रे यांनी वकील संघाचे अध्यक्ष पदाधिकारी आणि ज्येष्ठ विधीज्ञानचा शाल व फेटा आणि पैठणी साडी देऊन सह पत्नी सन्मान केला या कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि पंढरपूर अधिवक्ता संघ यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी दिनांक १ सप्टेंबर २०२४ रोजी येथील दाते मंगल कार्यालयात सांगोला रोड पंढरपूर येथे करण्यात आली होते.एवढी पंढरपूर अधिवक्ता संघाचे अध्यक्ष राजे चौगुले, उपाध्यक्ष महेश कसबे, सचिव अभयसिंह देशमुख, सदस्य निकिता अवताडे, संदीप ननवरे, पराग जागीरदार, विजयकुमार नाटक, समाधान गायकवाड, विलास साळुंखे, गणेश चव्हाण, कीर्तीपाल सर्व गोड, रेखा यादव, यांच्यासह मनसे जिल्हाध्यक्ष प्रशांत गिड्डे शशिकांत पाटील, संतोष कवडे, गणेश पिंपळने कर, महेश पवार नानासाहेब कदम, पंढरपूर जिल्हा व सत्र न्यायालयातील विधी विधींना मोठ्या संख्येने उपस्थित होते

### मुंबई-इंदूर नवीन रेल्वे मार्ग

पर्यटनालाही चालना मिळेल. या नव्या रेल्वे मार्गामुळे महाराष्ट्रातील आणि मध्य प्रदेशातील पर्यटक विविध पर्यटन व धार्मिक स्थळांना सहजरित्या भेट देऊ शकतील. या प्रकल्पामुळे पीथमपूर ऑटो क्लस्टरला (९० मोठे कारखाने आणि ७०० लघु आणि मध्यम उद्योग) जेएनपीएच्या गेटवे बंदराला आणि इतर राज्य बंदरांना थेट जोडणी होऊ शकेल. मध्य प्रदेशातील बाजरी उत्पादक जिल्हे आणि महाराष्ट्रातील कांदा उत्पादक जिल्ह्यांना थेट संपर्क उपलब्ध होईल. तसेच देशाच्या उत्तर आणि दक्षिण भागात त्याचे वितरण सुलभ होईल.कृषी उत्पादने, खते, कंटेनर, लोह खनिज, पोलाद, सिमेंट, पीओएल इत्यादी वस्तूंच्या वाहतुकीसाठी हा एक आवश्यक मार्ग आहे. क्षमता वाढीच्या कामामुळे सुमारे २६ एमटीपीए (वार्षिक दशलक्ष टन) अतिरिक्त मालवाहतूक होईल रेल्वे हे पर्यावरणस्नेही आणि ऊर्जा कार्यक्षम वाहतुकीचे साधन आहे, जे हवामान उद्दिष्टे साध्य करण्यात आणि देशातील लॉजिस्टिक खर्च कमी करण्यात, तेलाची आयात (१८ कोटी लिटर) कमी करण्यात आणि कार्बन डाय ऑक्साईड उत्सर्जन (१३८ कोटी किलोग्रॅम) कमी करण्यात मदत करेल, जे ५.५ कोटी झाडे लावण्याइतकेच असेल, असे केंद्रीय रेल्वे मंत्रालयाने सांगितले.

### कृषिक्षेत्रासाठी १४ हजार

विज्ञान केंद्रांसाठी १ हजार २०२ कोटी रुपयांच्या खर्चाला मंजुरी देण्यात आली आहे.याशिवाय गुजरातच्या सानंद येथे सेमीकंडक्टर युनिट स्थापन करण्याच्या प्रकल्पालाही केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे. याप्रकल्पासाठी तीन हजार ३०० कोटी रुपयांच्या खर्चाला मंजुरी दिली आहे. तसेच केंद्र सरकारने मुंबई इंदौर या ३०९ किलोमीटर लांबीच्या नवीन रेल्वे रुळासाठी १८ हजार ३६ कोटी रुपये खर्चालाही मंजुरी दिली आहे.

### 'तिरुपती'च्या प्रसादासाठी

आल्या होत्या. याला आळा घालण्यासाठीच आधार कार्ड अनिवार्य केले आहे. प्रसादाच्या लाडू विक्रीसाठी विशेष काउंटर बनवण्यात आले आहे. काउंटर नंबर ४८ आणि ६२ वर हे लाडू मिळतील. दर्शनासाठी टोकन किंवा तिकीट असणारे भक्त पाहिल्याप्रमाणे एक मोफत लाडू मिळाल्यानंतरदेखील अजून लाडू विकत घेऊ शकतात. मात्र, ज्या भक्तांच्या जवळ दर्शन तिकीट आणि टोकन नाही, त्यांनी लाडूचा प्रसाद घेण्यासाठी आधार कार्ड दाखवणे आवश्यक राहील.

# राष्ट्रवादीच्या जिल्हाध्यक्षांनी शहराध्यक्षाच्या राजीनामेला लावला ब्रेक

**दैनिक यशसिद्धी न्युज**

पंढरपूर/ प्रतिनिधी : सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष काका साठेंनी शहराध्यक्षाच्या राजीनामेला ब्रेक लावला व काकांनी लावला थेट फोन



राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाची सोलापूर शहराध्यक्ष सुधीर खरटमल यांनी शहरातील अंतर्गत कला राजकारणाला कंटाळून तडकाफडकी राजीनामा दिल्यामुळे मोठी खळबळ उडाली आहे यांचा राजीनामा जिल्हाध्यक्ष काका साठे यांनी ब्रेक लावला आहे खरटमल यांचा राजीनामेची बातमी सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर काका साठे यांनी करंट मधून त्यांच्याशी संपर्क साधून राजीनामाची नेमकी कारण विचारले यावर करंटमले यांनी महापौर महेश कोठे तोफिक शेख यांच्यामुळे राजीनामा देत असल्याचे सांगितले या सर्व पार्श्र्वभूमीवर काका साठे यांनी थेट मुंबई वरिष्ठांनी संपर्क साधला व राजीनामा मंजूर करू नका त्यांना राजीनामा परत घ्यायला असे सांगितले आहे आगामी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर हा गोंधळ पडल्याने पक्षाबाबत जनतेमध्ये वेगळा मेसेज जाईल यामुळे आता यावर पक्ष सिटी काय निर्णय घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागलेली आहे

### अनंत इधे याचं दु:खद निधन

मोखाडा : मोखाडा तालुक्यातील खोडाळा गावचे रहिवासी सामाजिक कार्यकर्ते अनंत शंकर इधे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले अनंत इधे यांचा सामाजिक



चळवळीत काम उल्लेखनीय होते मोखाडा परिसरात ते इधे मोठे मामा म्हणून परिचित होते पालघर जिल्ह्यात राघोजी भांगरे व बिरसा मुंडा यांची जयंती प्रथमच साजरी करण्याचे श्रेय त्यांच्याकडे जाते शिव फुले, बिरसा शाहू, आंबेडकर तसेच आदिवासी चळवळीच्या कार्यात ते नेहमीच अग्रेसर असत

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

दैनिक
यश सिद्धि न्यूज



## रेनी कार्निवल संवाद तरूणाईचा मोठ्या उत्साहात

# तरुणांनी संसद संवाद,गाणी ,कविता, एकपात्री सादर करत केले प्रबोधन



**दैनिक यशसिद्धी न्युज**

ठाणे/मिलिंद जाधव : शिव,बिरसा, फुले,शाहू,आंबेडकरी चळवळ अधिक गतिमान करण्यासाठी आजचे युवक, युवती एकत्र येऊन काम करणे खूप गरजेचे आहे. तसेच त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी व त्यांना विचारमंच उपलब्ध करून देण्यासाठी समता संघर्ष संघटन व समता संघर्ष संघटन सांस्कृतिक मंच यांच्या वतीने शिव ,बिरसा, फुले,शाहू,आंबेडकरी विचारधारेवर आधारीत विशेष युवकांसाठी रेनी कार्निवल संवाद तरूणाईचा या कार्यक्रम रविवार दि. १ सप्टेंबर २०२४ रोजी शहापूर तालुक्यातील आसनगांव येथिल पिताश्री लॉन्स येथे मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शैलेश दोंदे होते. कार्यक्रमाचे उद्घाटन मुंबई विद्यापीठ, लोककला अकादमी, विभाग प्रमुख , प्रा . डॉ. गणेश चंदनशिवे यांनी केले. तर स्वागताध्यक्ष सदानंद गायकवाड,गणेश सोष्टे होते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ कलाकार पुढे नेत आहे. समतेच्या मार्गाने आम्हाला पुढे जायचं आहे. लोककलेतून प्रबोधन झालं पाहिजे.

असे सांगत महामानवांचे जिवनपट आपल्या गाण्यातून मांडत प्रा. डॉ. गणेश चंदनशिवे यांनी प्रबोधन केले.तर प्रमुख म्हणुन मुंबई महानगरपालिकेचे शहर उपअभियंता महेंद्र उबाळे, मीरा भाईंदर महानगरपालिकेचे उपायुक्त संजय दोंदे, अनिसचे उत्तम जोगदंड, सामाजिक कार्यकर्ते राहुल जाधव, धम्मदीप कल्चर संस्थेचे अशोक दूधसागरे,निवृत्त उपजिल्हाधिकारी नापा जाधव, सहाय्यक प्रकल्प अधिकारी दीपक टिके, वासिंद सोसायटीचे संचालक विद्याधर जाधव, ओबीसी संघटक भरत निचीते, ओबीसी संघर्ष समिती महिला अध्यक्षा साधना भेरे, सामाजिक कार्यकर्त्या रंजना घाटाळ, कॉ. संभाजी भेरे उपस्थित होते.

यावेळी समता संघर्ष संघटन व समता संघर्ष सांस्कृतिक मंच यांच्या वतीने प्रा. डॉ. गणेश चंदनशिवे यांना मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. सांस्कृतिक चळवळ गतीमान करण्यासाठी आजच्या तरुणांना एकत्र आणणे काळाची गरज आहे. असे कार्यक्रमाचे अध्यक्ष शैलेश दोंदे यांनी बोलताना सांगितले. या कार्यक्रमात विशेष म्हणजे तरुणांची संसद सवांद भरवण्यात आली असून त्यात तरुणांनी आरक्षण उपवर्गीकरण विधेयक २०२४ यावर आपली मते मांडली. हा उपक्रम खास आकर्षण ठरला. यावेळी, भिवंडी, शहापूर,कल्याण , बदलापूर , अंबरनाथ,मुरबाड, मुंबई येथिल तरुणांनी कविता, गाणी,एकपात्री अशा विविध कला सादर करून प्रबोधन केले. यावेळी समता संघर्ष संघटनचे अध्यक्ष शैलेश दोंदे, उपाध्यक्ष सदानंद गायकवाड, संघटक

गणेश सोष्टे, पदाधिकारी अविनाश दोंदे, अँड. श्रीकांत कांबळे, रविंद्र गायकवाड, तर विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समन्वयक मिलिंद जाधव , सुरेखा पैठणे, रोहित जाधव,अक्षय भोईर,संघरत्न घनघाव , सागर भोईर,किशोर सावंत, सुरज भालेराव, संजीवकुमार शिंदे ,दुहिता जाधव, कपिल जाधव , विशाल जाधव यांनी अथक परिश्रम घेतले.

# श्री क्षेत्र नंदिकेश्वर परिसराचा लवकरच कायापालट करणार : आमदार दत्तात्रय भरणे



**दैनिक यशसिद्धी न्युज**

इंदापुर/अतुल सोनकांबळे: दगडवाडी परिसरातील श्री क्षेत्र नंदिकेश्र्वर येथे श्रावणी यात्रेनिमित्त आमदार दत्तात्रय भरणे यांनी शंभु महदेवास सपत्निक दुधाभिषेक करुन मनोभावे दर्शन घेतले.इंदापूर तालुक्यातील दगडवाडी परिसरात नीरा नदीच्या काठावर प्राचीन हेमाडपंथी श्री नंदिकेश्र्वर मंदीर वसले असुन अगदी पुरातन काळापासून या मंदिराचे वेगळेपण आहे.यावेळी शंभु महादेवाच्या दर्शनासाठी हजारो भक्तांची मांदीयाळी असतो.आमदार दत्तात्रय भरणे हे सुद्धा दरवर्षी श्री नंदिकेश्र्वर चरणी लीन होत असतात.

सालबादप्रमाणे यंदाही आमदार दत्तात्रय भरणे व त्यांच्या सुविद्यपत्नी सौ.सारिका भरणे यांच्या शुभहस्ते श्री शंभु महादेवाची विधिवत पुजा संपन्न झाली.यावेळी श्री.भरणे यांनी मंदिर परिसरात चालु असलेल्या विविध विकासकामांची पाहणी केली.तसेच यात्रेनिमित उपस्थित भाविकांशी संवाद साधत असताना ते म्हणाले की,श्री क्षेत्र नंदिकेश्र्वर देवस्थान हे आपल्या तालुक्यातील एक महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असून याठिकाणी अनेक धार्मिक कार्यक्रम समारंभ होत असतात.त्यामुळे या ठिकाणी आपण अनेक सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या असुन.मंदिर परिसरात शुशोभीकरण करण्यासाठी लाखो रुपयांचा निधी दिला असल्याचे सांगत आमदार भरणे पुढे म्हणाले की,हे तीर्थक्षेत्र एक चांगले पर्यटन केंद्र म्हणून ही नावारूपाला येत आहे,यासाठी आपणही प्रयत्नशील असून याठिकाणी नदी काठावर घाट बांधण्यासाठी प्रस्ताव शासन दरबारी दिला आहे.त्यामुळे लवकरच यासाठी सुद्धा भरघोष निधी आपल्याला मिळणार असल्याची माहिती आमदार भरणे यांनी दिली.

त्याच बरोबर यंदा आपल्या तालुक्यात अजूनही सर्वदूर म्हणावा तसा पाऊस पडला नाही,यासाठी त्यांनी नंदिकेश्र्वराच्या चरणी लीन होताना सर्वत्र चांगल्या प्रमाणात पाऊस पडून अनेक अस्मानी संकटांशी सामना करणाऱ्या बळीराजा,कष्टकऱ्याच्या घरादारात यंदा आनंद येऊ दे,अशी प्रार्थना यावेळी केली.

# ३६ वर्षीय महिला डॉक्टरांचे आत्महत्या

**दैनिक यशसिद्धी न्यूज नेटववर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : मोहोळ येथे ३६ वर्षेय महिला डॉक्टरांची अज्ञात कारणावरून आत्महत्या मोहोळ शहरातील डॉ. आंबेडकर चौक मोहोळ मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलच्या डॉक्टर रश्मी संतोष बिराजदार वय ३६ वर्षे यांची अज्ञात कारणावरून राहत्या घरामध्ये छताच्या पंख्याला साडीच्या साह्याने गळफास घेऊन



आत्महत्या केल्याची घटना रविवार दिनांक १ सप्टेंबर २०२४ रोजी घडले आहे सोलापूर जिल्ह्यातील सांगोला पेनुर मोहोळ तीन महिन्यांमध्ये तीन महिला डॉक्टरांनी आत्महत्या केल्याने वैद्यकीय क्षेत्रात मोठा धक्का बसला आहे पोलीस सूत्राकडून मिळालेली माहिती अनुसार मोहोळ येथील आंबेडकर चौक येथे मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलच्या डॉक्टर रश्मी संतोष बिराजदार वही वर्षी ३६ व पती एक मुलगा व एक मुलगी यांच्यासह आंबेडकर चौक मोहोळ येथे राहत होत्या रविवारी दिनांक एक सप्टेंबर रोजी अज्ञात कारणावरून घरांमध्ये छताच्या पंख्याला साडीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे खबर पती संतोष शंकर बिराजदार वय वर्ष ३६ यांनी मोहोळ पोलीस साथ दिली असून पुढील तपास पोलीस हवालदार उपाशी करीत आहे

# राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा नांदेड दौरा

## ✲ उदगीर येथील बुद्धविहाराच्या उद्घाटन समारंभास उपस्थिती ✲ नांदेड येथील तख्त सचखंड श्री हुजूर साहिब गुरुद्वारासही भेट

**दैनिक यशसिद्धी न्यूज नेटववर्क**

नांदेड : लातूर जिल्ह्यातील उदगीर येथे बुद्ध विहाराचा उद्घाटन कार्यक्रम ४ सप्टेंबर २०२४ रोजी होत आहे. या कार्यक्रमाला भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या उपस्थित राहणार आहेत. उदगीर येथे जाण्यापूर्वी त्यांचे नांदेड विमानतळावर बुधवार ४ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी १०.२५ वाजता आगमन होईल. त्यानंतर सकाळी १०.३५ वा. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या हेलिकॉप्टरने उदगीर येथील बुद्धविहार उद्घाटन कार्यक्रमासाठी प्रयाण करतील. बुद्ध विहाराच्या उद्घाटन कार्यक्रमानंतर मुख्यमंत्री महिला सक्षमीकरण अभियान व शासन आपल्या दारी या संयुक्त अभियानात त्या सहभागी होणार आहे. या कार्यक्रमाला राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले, ग्रामविकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन, क्रीडामंत्री संजय बनसोडे यांच्यासह मंत्रिमंडळातील विविध सदस्य उपस्थित राहणार आहेत. उदगीर येथील कार्यक्रमानंतर सायंकाळी ४.३५ वाजता राष्ट्रपती महोदयांचे नांदेड विमानतळावर आगमन होईल. सायंकाळी ४.४५ वाजता नांदेड विमानतळ येथून वाहनाने गुरुद्वारा रोड, यात्री निवास रोड नांदेड येथे आगमन. सायं ५ ते ५.०५ वाजेपर्यंत टीबीसी स्थानिक कार्यक्रमास उपस्थिती. सायंकाळी ५.५ ते ५.१५ राखीव. सायंकाळी ५.१५ ते ५.४० पर्यंत तख्त सचखंड श्री हुजूर साहिब नांदेड येथे भेट. सायं. ५.४० वाजता तख्त सचखंड श्री हुजूर साहिब नांदेड येथून नांदेड विमानतळाकडे वाहनाने प्रयाण. सायं. ५.५५ वाजता नांदेड विमानतळावर आगमन. त्यानंतर सायंकाळी ६.०५ वाजता नांदेड विमानतळ येथून विमानाने दिल्लीकडे प्रयाण करतील.

राष्ट्रपतींच्या नांदेड येथील ४ सप्टेंबर २०२४ रोजीच्या दौऱ्यानिमित्त जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक घेतली. या बैठकीस सर्व विभाग प्रमुखांची उपस्थिती होती. राष्ट्रपती महोदयांच्या नांदेड येथील दौऱ्यानिमित्त संबंधित विभागानी आपआपली जबाबदारी पूर्ण पाडण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी यांनी निर्देश दिले.

# प्रभारी तहसीलदार प्रविण धानोरकर यांचा यशस्वी कार्यकाळ

## त्यांच्या कार्यकाळात ३९ लक्ष ३८ हजार दंड

**दैनिक यशसिद्धी न्यूज नेटववर्क**

बुलढाणा / राहुल साबळे : सिंदखेडराजा तहसिल विभाग कोणत्या ना कोणत्या कारणासाठी प्रसिद्ध असते हा तालुका मोठा असल्यामुळे तालुका दररोज विद्यार्थी ,दिव्यांग ,संजय गांधी निराधार योजना ,खरेदी विक्री ,रेशन कार्ड मतदान नवीन नोंदणी या साठी दररोज या कार्यालयात मोठ्या प्रमाणात नागरिकांची गर्दी असते




मागील तहसीलदार सचिन जयस्वाल यांची कारकीर्द म्हणावी तशी चांगली राहिली नाही त्यांच्या कारकीर्दीत मोठ्या प्रमाणात रेती उत्खनन मोठ्या प्रमाणात झाले .आर्थिक देवाण घेवाण मुळे त्यांच्यावर लाच लुचपत प्रतिबंधक कारवाई झाल्यामुळे त्यांच्या जागी प्रभारी तहसीलदार म्हणून प्रवीण धानोरकर १३ एप्रिल २४ पासून रुजू झाले .त्यांनी तहसीलदार पदाची सूत्रे हातात घेतल्यापासून त्यांच्या कार्यकाळामध्ये एकही समोर उपोषण झाले नाही त्यांनंतर लाडकी बहीण योजनेअंतर्गत रेशन कार्ड विभक्त करणे , संजय गांधी निराधार योजनेचे दाखले देणे, पांदण रस्त्याची कामे मार्गी लावणे, शेतीबाबतचे प्रकरण निकाली काढणे, त्याबाबतची जबाबदारी त्यांनी चोखपणे पार पाडली.रेती उत्खन बाबत त्यांनी आज पर्यंत २० अवैध उत्खनन गौण खनिज वाहतूक करणाऱ्या विरुद्ध ३९ लक्ष ३८ हजार एवढी दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे . तसेच त्यांच्याकडे सिंदखेडराजा येथील उपविभागीय अधिकारी यांचा अतिरिक्त कारभार असताणा डीग्रस बु येथील हजारो ब्रास रेतीसाठी जप्त करण्यात आला त्याची हरासी करून शासनास २३ लक्ष ६०४ रुपये महसूल जमा करण्यात आला . तसेच तालुक्यामध्ये कुठेही अवैध रेती उत्खनन होणार नाही त्याकरता छुपे रस्ते तोडण्यात आले व बैठे पथक तयार करण्यात आले असून त्या बाबत सर्व मंडळ अधिकारी तलाठी कोतवाल सर्वांना कामाला लावल्यामुळे रेती तस्कराला बसला आहे.या सर्व प्रकारामुळे प्रभारी तहसीलदार प्रवीण धानोरकर यांची सहा महिन्याचे कारकीर्द यशस्वी ठरली असे म्हणणे वाघे ठरणार नाही.

# अक्कलकोट येथे 'प्रसादरुपी खुराक चाचणी कुस्ती स्पर्धा-२०२४'

**दैनिक यशसिद्धी न्यूज नेटववर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी: श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली तालुक्यात प्रथमच 'प्रसादरुपी खुराक चाचणी कुस्ती स्पर्धा-२०२४' मंगळवार दि. ३ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ११ वा. फतेसिंह क्रिडांगण, इन्डोअर स्टेडियम येथे आयोजित करण्यात आल्याची माहिती अक्कलकोट तालीम संघाचे अध्यक्ष पै .महेश कुलकर्णी यांनी दिली आहे.

कुस्तीला उभारणी व नव चालना, संजीवनी मिळण्यासाठी, नवोदित पैलवानांच्या पाठीवरती कौतुकाची थाप मिळावी, अनेक होतकरू, कष्टकरी पैलवान समोर यावेत याकरिता गत जानेवारी पासून न्यासाकडून प्रसाद रुपी खुराक देण्यात येत आहे. सध्या कुस्तीक्षेत्रामध्ये वैविध्यपूर्ण आणि विकासात्मक प्रयत्न सर्व स्तरातून केले जात आहेत. अनेक मैदानामध्ये नवोदीत होतकरू आणि चांगल्या पैलवानांना पाठबळ मिळवून देण्यासाठी अनेक वस्ताद मंडळी झटत असतात. खऱ्या अर्थाने विविध तालमीतील उदयोन्मुख पैलवान जपत असतात. कुस्ती जगवताना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. हे ओळखून श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली तालुक्यातील कुस्तीगीरांना न्यासाकडून प्रसाद रुपी खुराक देण्यात येत आहे. त्यामुळे कुस्तीगीरांना अच्छे दिन आले आहेत.

या चाचणी स्पर्धेतील विजेते वजनी गटात तीन प्रथम, द्वितीय, तृतीय मानांकित पैलवानास दरमहा खालीलप्रमाणे प्रसादरुपी लाभ मिळणार आहे.

त्यांना तीन किलो तूप, तीन किलो बदाम, एक किलो खारीक, थंडाई मसाला देण्यात येणार आहे. या चाचणी स्पर्धेकरिता डबल उपमहाराष्ट्र केसरी पै.मौलाली शेख, उपमहाराष्ट्र केसरी पै.भरत मेकाले, एन.आय.एस. कोच राष्ट्रीय पंच पै.धनराज भुजबळ, महाराष्ट्र चॅम्पीयन पै.ताजाजी भोसले, सरफराज शेख, आतिष पवार यांच्यासह आदिजणाचे विशेष सहकार्य लाभत आहे. तरी या चाचणी स्पर्धेस उपस्थित राहण्याचे आवाहन तालीम संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

# इंदू मिल येथील स्मारकासाठी वादळापासून संरक्षण होणार नवीन टेक्नॉलॉजी वापरून नव्याने बदल करणार : एम.एम.आर.डी.ए



**दैनिक यशसिद्धी न्यूज नेटववर्क**

मुंबई/विजय घनघाव :छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा भ्रष्टाचारामुळे झालेली दुर्घटना झाल्यामुळे संपूर्ण महाराष्ट्र नवे देशातून सरकारच्या विरोधात विविध संघटने रस्त्यावर उतरताना बघितले यामुळे सावध भूमिका घेऊन इंदू मिलच्या स्मारक संरक्षण समितीने इंदू मिल येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आंतरराष्ट्रीय स्मारकास होणारा विलंब विनाकारण होत असलेली निधी वाढ. तिथे होणाऱ्या फक्त १५०० खुर्च्यांचे हॉल ऐवजी साडेतीन ते पाच हजार खुर्च्यांचा ऑडिटर हॉल झाला पाहिजे तसेच वादळामुळे भविष्यात पुतळ्याला कोणतीही हानी होऊ नये. यासाठी नवीन टेक्नॉलॉजीचा वापर व्हावा. असे अनेक विषय या बैठकीत घेतले त्यावेळेस शिवसेनेचे नेते माननीय खासदार श्रीमान अनिल देसाई साहेबांनी सोमवार दिनांक २ सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी ३.३० वाजता. स्थळ -९वा मजला, डीर कार्यालय, बॅरिस्टर रजनी पटेल मार्ग, नरिमन पॉइंट, समजून घेण्यासाठी तातडीने बोलवलं होती यावेळेस एम एम आर डी ए चे आयुक्त संजय मुखर्जी साहेब व संबंधित अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय इंदू मिल संघर्ष समिती -शिष्ट मंडळ- विलास रुपवते- संघटक शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, अक्षय आंबेडकर डॉ आंबेडकर यांचे पंतू, रमेश मा जाधव कामगार नेते चैत्यभूमी व्यवस्थापक, रवी गरुड दलित सेना नेते ,अशोक कांबळे भीम आर्मी नेते,अरुण घाडगे, बाळासाहेब पवार आर.पी.आय-कार्याध्यक्ष, शैलेंद्र मोहिते कामगार नेते, प्रतीक कांबळे अध्यक्ष विश्र्वशांती संस्था ,अनिल कदम माजी नगरसेवक, अविनाश गरुड , सचिन परब, आनंद केदारे उपस्थित होते

# भिम साम्राज्य सोशल फाऊंडेशनचे रिपाई नूतन ता उपाध्यक्ष प्रकाश गडगडे यांची सत्कार



**दैनिक यशसिद्धी न्यूज नेटववर्क**

नागणसुर : नुकतेच रिपाई ता उपाध्यक्षपदी प्रकाश गडगडे यांची निवडीचे सत्कार लोकनेते रिपाई प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरवदे साहेब व रिपाई ता अध्यक्ष अविनाश मडीखांबे यांनी केले. त्याच अनुसंगाने पुणे येथे प्रकाश गडगडे यांनी सर्व रिपाईचे कार्येकर्तेना भेट घेतले व रिपाई कार्येकर्ते व भीमसाम्राज्य सम्राज्य सोशल फाऊंडेशन वतीने सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आले ,यावेळी रिपाईचे कट्टर समर्थक तथा संस्थेच्या अध्यक्ष बसवराज आलमेल, सचिव महादेव चिक्कळी व इतर पदाधिकारी उपस्तित होते.

# उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त ५ सप्टेंबर रोजी पंढरपुरात होणार

## आदर्श मातांचा व कर्तृत्ववान महिलांचा मातोश्री शारदाई पुरस्काराने सन्मान : श्रीकांत शिंदे



**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधीः राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष महाराष्ट्र राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री मा.ना.अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त आदर्श माता व कर्तृत्ववान महिलांचा सन्मान मातोश्री शारदाई पुरस्कार २०२४ व गरजू शालेय मुलींना सायकल वाटप राज्याच्या महिला व बालविकास मंत्री मा.ना.अदिती तटकरे यांच्याहस्ते व महिला आयोगाच्या अध्यक्षा मा.ना.रूपाली चाकणकर यांच्या अध्यक्षतेखाली गुरूवार दि.५ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता श्रीराम मंगल कार्यालय इसबावी पंढरपूर येथे करण्यात येणार आहे अशी माहिती राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस श्रीकांत शिंदे यांनी दिली.

आपल्या आदर्शवत संस्काराने समाजात अशा अनेक आई आहेत की ते आपल्या मुलांना घडवण्यासाठी आपल्या सुखाची तिलांजली देऊन समाजामध्ये आपल्या मुलाला कर्तृत्वाने पुढे आणण्याचे काम करत असतात. अशा आदर्श मातांना शारदाई पुरस्कार देवून सन्मानित सन्मानित करण्यात येत असते. त्यासाठी यावर्षीचे पुरस्कार घोषित झालेल्या आदर्श माता श्रीमती मंगलताई भीमराव महाडिक (खा.धनंजय महाडिक मातोश्री), श्रीमती मालनबाई वसंतराव काळे (चेअरमन कल्याणराव काळे यांच्या मातोश्री), सौ शोभाताई शिवाजीराव काळुंगे (मुख्य कार्यकारी अधिकारी राजलक्ष्मी गायकवाड यांच्या मातोश्री), श्रीमती सुशीलाताई हरिभाऊ अक्कलकोटे (बार्शीचे नगरसेवक नागेगश अक्कलकोटे यांच्या मातोश्री), मुमताज रशीद शेख (महाराष्ट्र केसरी पै.सिकंदर शेख यांच्या मातोश्री), सौ ललिता लक्ष्मण चव्हाण (आय.ए.एस.राहुल चव्हाण यांच्या मातोश्री), श्रीमती सुलोचना मल्हारी मोकाशी (प्रसिध्द बाधंकाम व्यावसायिक चंद्रशेखर मोकाशी यांच्या मातोश्री) यांना यावर्षीचे शारदाई पुरस्कार देण्यात येणार आहेत.

या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, राष्ट्रवादीचे प्रदेश प्रवक्ते उमेश पाटील, राष्ट्रवादी विद्यार्थी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष प्रशांत कदम, युवती राष्ट्रवादी प्रदेशाध्यक्ष संध्या सोनवणे व राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष मा.आ.दिपकआबा साळुंखे-पाटील, मा.आ. प्रशांतराव परिचारक, आमदार समाधान आवताडे, चेअरमन कल्याणराव काळे, चेअरमन अभिजीत पाटील, मा.चेअरमन भगिरथ भालके, मनसे नेते दिलीप धोत्रे, शिवसेनेचे ज्येष्ठ नेते साईनाथ अभंगराव,

भीमा परिवाराचे नेते पवन महाडिक, पंढरपूर अर्बन बँकेचे चेअरमन सतीश मुळे, पुंडलिक देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष बाबा अधटराव, राष्ट्रवादी युवकचे प्रदेश उपाध्यक्ष समाधान काळे, धनश्री पतसंस्थेचे चेअरमन शिवाजीराव काळुंखे यांच्यासह विविध मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत सदरचा कार्यक्रम संपन्न होणार आहे अशी माहिती संयोजक श्रीकांत शिंदे यांनी दिली.

# जगाला शांती आणि अहिंसेचा संदेश देणाऱ्या भारत देशात अशांतता नसावी : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले




**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

कलकत्ता/प्रतिनिधीः तीर्थंकर भगवान महावीर आणि तथागत भगवान गौतम बुद्ध यांनी जगाला शांती आणि अहिंसेचा संदेश दिला आहे. शांती आणि अहिंसेचा संदेश भारतातूनच जगभर पोहोचला आहे. जगाला शांती आणि अहिंसेचा संदेश देणाऱ्या भारतात अशांतता नसावी अशी अपेक्षा रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री नामदार रामदास आठवले यांनी व्यक्त केली.

कलकत्ता येथील राज भवन मध्ये तीर्थंकर भगवान महावीर यांच्या २५५० व्या निर्वाण स्मृती वर्षानिमित्त आयोजित शांती आणि अहिंसा परिषदेस प्रमुख अतिथी म्हणून संबोधित केले. त्यावेळी नामदार रामदास आठवले यांनी भारतात हिंसक अशांतता पसरविणारे प्रकार घडता कामा नयेत अशी अपेक्षा व्यक्त केली.यावेळी जैन धर्मगुरू देवेंद्र ब्रह्मचारी; उद्योजक महेंद्र दुसाकिया; माजी खासदार जगन्नाथ सरकार ; अशोक शेट्टी आदी अनेक मान्यवर उपस्थित होते.

जगात आज अनेक ठिकाणी युद्ध होत आहे.हिंसा घडता आहेत.अशांतता आहे.युद्ध हिंसा थांबवली पाहिजे जगाने अहिंसा आणि शांततेच्या मार्गानेच पुढे गेले पाहिजे. जगाला युद्धाची आणि तर भगवान महावीर आणि तथागत भगवान बुद्धांच्या शांतता आणि अहिंसा या तत्वांची गरज आहे. धर्मा धर्मातील जाती जातीतील वाद मिटवून महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला दिलेल्या संविधानातील समतावादी भारत सरकारला पाहिजे ; जगात देशाची मान उंच करा असे आवाहन ना. रामदास आठवले यांनी केले.

# राज्यातील प्रत्येक माणूस सुखी, समृद्ध, आनंदी होऊ दे ; मुख्यमंत्री यांची भीमाशंकराकडे प्रार्थना



**दैनिक यशसिद्धी न्यूज नेटववर्क**

पुणे: मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिरात ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेऊन विधिवत पूजा केली. राज्यात सर्वत्र चांगला पाऊस आहे, शेतात उदंड पीक येऊ दे; राज्यातील बळीराजा सुखी व समृद्ध होऊ दे. सर्व विभागातील प्रत्येक माणूस सुखी, समृद्ध, आनंदी होऊ दे, अशी प्रार्थना भीमाशंकराकडे केल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यावेळी म्हणाले.

पुजेनंतर मुख्यमंत्री श्री. शिंदे यांचा भीमाशंकर देवस्थान ट्रस्टच्यावतीने सत्कार करण्यात आला. यावेळी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, म्हाडाच्या पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, अपर जिल्हाधिकारी अजय मोरे, माजी आमदार शरद सोनवणे आदी उपस्थित होते.

भीमाशंकराचे दर्शन घेतल्यानंतर मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, राज्यातून येणाऱ्या भाविकांना येथे दर्शनाचे भाग्य लाभते. मी दरवर्षाप्रमाणे यावर्षीही श्रावणी सोमवारी दर्शनासाठी आलो आहे. दर्शनानंतर अभिषेक झाल्यानंतर मनाला समाधान वाटते. ही वास्तू प्राचीन असून येथून सकारात्मक उर्जा मिळते. यावेळी देवाला साकडे घालताना राज्यातील संपूर्ण जनता भीमाशंकराच्या आशीर्वादाने सुखी, समृद्ध होऊ दे, आयुष्यात चांगले दिवस येऊ दे, त्यांच्या जीवनात परिवर्तन येऊ दे; सुखाचे, समाधानाचे आणि आनंदाचे दिवस त्यांच्या कुटुंबात येऊ दे, अशी प्रार्थना केल्याचे श्री. शिंदे म्हणाले.

महाराष्ट्र प्रगत राज्य असून आपण राज्यात अनेक कल्याणकारी योजना सुरू केल्या आहेत. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, अन्नपूर्णा योजना, मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना, मुलींना मोफत व्यावसायिक उच्च शिक्षण, ज्येष्ठ नागरिकांसाठी योजना आदी कल्याणकारी योजना राबवत आहोत. एकीकडे कल्याणकारी योजना आणि एकीकडे विकास अशी सांगड घालण्याचा आम्ही प्रयत्न करतोय. असेच काम चालू ठेवण्यासाठी ताकद, प्रेरणा आणि ऊर्जा द्यावी, अशी प्रार्थना केल्याचे श्री. शिंदे म्हणाले.

याप्रसंगी खेडचे उपविभागीय अधिकारी अनिल दौंडे, जुन्नर - आंबेगाव चे उपविभागीय अधिकारी गोविंद शिंदे, खेडचे उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल मांडवे, खेड तहसीलदार तथा देवस्थानच्या कार्यकारी विश्र्वस्त ज्योती देवरे, श्री क्षेत्र भीमाशंकर देवस्थानचे अध्यक्ष ड. सुरेश कौदरे, विश्र्वस्त मधुकर गवांदे, दत्तात्रय कौदरे, रत्नाकर कोडीलकर, सरपंच दत्तात्रय हिले आदी उपस्थित होते.

# समस्याचे निराकरण त्वरित होण्यासाठी मुख्याधिकारी रमाकांत डाके यांना निवेदन



**दैनिक यशसिद्धी न्यूज नेटववर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधीः शहरातील गणेशोत्सव तरुण मंडळांना नेहमीच उत्सवाचा काळात साथ देणारे नगर परिषदेचे माजी पक्षनेते महेश हिंडोळे यांनी उत्सवाच्या पार्श्र्वभूमीवर विविध समस्याचे निराकरण त्वरित होण्यासाठी मुख्याधिकारी रमाकांत डाके यांना निवेदन सादर केले आहेत. यामध्ये प्रामुख्याने शहरातील मिरवणूक मार्गावर अडथळा येणाऱ्या मार्गाची मुख्याधिकारी यांनी प्रत्यक्ष पहाणी करून सर्व खड्डे बुजविणे, चुकीचे गतिरोधक आळवीणे, झाडांच्या फांद्या तोडणे, केबल वायर हटविणे, मिरवणूकीत अडथळा ठरणारे कळीचा मुद्दा असलेले अतिक्रमणास देशमुख गल्ली ते दावल ब्यांड या पालखी मार्गावरील सर्व अतिक्रमण व गतिरोधक काढणे, याबरोबरच जय जवान गल्ली येथील जिरोळे यांच्या घरासमोरील विद्युत खांब बाजूला काढणे, यासह राम गल्लीतील टेलिफोन खांब व बंद हातपंपही काढावेत, आणि शहरातील सर्व गणेश मंडळांच्या जागेची स्वच्छता करणे, आदिबाबतचे निवेदन मुख्याधिकारी रमाकांत डाके यांना देण्यात आले. याप्रसंगी दयानंद बिडवे, विजयकुमार मलंग, रोहित सुतार उपस्थित होते.

# साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीच्या समापन दिनानिमित्त पारखे यांचा स्तुत्य उपक्रम

## डिजेच्या घोंगाट्यापेक्षा वाचनालय काळाची गरज : प्रथमेश म्हेत्रे




**दैनिक यशसिद्धी न्यूज नेटववर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधीः डीजेच्या घोंगाट्यापेक्षा गरिब व गरजू विद्यार्थी व तरूणासाठी वाचनालयाची गरज ओळखुन जोतिबा पारखे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीच्या समापन दिनानिमित्त ग्रंथालय व अभ्यासिका केंद्र सुरू केले.स्तुत्य उपक्रम हे कौतुकास्पद असल्याचे प्रथमेश म्हेत्रे यांनी बोलतांना म्हणाले. साहित्यरत्न लोकशाहीर सत्यशोधक अण्णाभाऊ साठे यांच्या १०४व्या जयंतीच्या समापन दिनानिमित्त माणिक पेठ,अक्कलकोट येथे फकीरा दलाच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रेरित सत्यशोधक आण्णाभाऊ साठे ग्रंथालय व अभ्यासिका केंद्राचे उदघाटन प्रसंगी प्रथमेश म्हेत्रे बोलत होते.

तत्पूर्वी सर्व महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन विविध मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.यावेळीए.पी.आय बागाव,ज्येष्ठ समाजसेवक युवराज पवार,माजी

नगरसेवक सद्दाम शेरीकर,आर.पी.आय तालुका अध्यक्ष अविनाश मडीखांबे,ज्येष्ठ समाजसेवक निवृत्ती पारखे,माजी नगरसेविका पुतळाबाई शिरसागर,किसन जाधव,ताराबाई शिरसागर,संदीप मडीखांबे उपस्थित होते. बोलताना आदर्श शिक्षिका रिंकू जाधवर धस म्हणाल्या की,पुन्हा शाहू फुले आंबेडकर,अण्णाभाऊ येणार नाहीत.त्यांची वाट न पहाता त्यांचा विचारांचा वारसा घेऊन आपण पुढे जाण्याची गरज आहे.असे म्हणाल्या.अशिस गायकवाड यांनी सुरवातीला अण्णाभाऊ यांच्या बद्दल अतिशय महत्त्वपूर्ण माहिती व महत्व पटवून दिले.यावेळी आशिस,राहूल ढोबळे,रशीद किस्तके,रिंकू जाधवर धस,मोहसीन मोकाशी,सोहेल फरास,बुडन तांबोळी,सूरेश सोनकांबळे,अंबादास शिंगे,हर्षवर्धन देडे,नवनाथ धस, देवेंद्र शिंदे सह आदी समाजबाधंव मोठ्या संख्येने उपस्थित होते.सुत्रसंचालय व अभार जोतिबा पारखे यांनी मानले.

# प्रधानमंत्री पिक विमा योजना: पिक नुकसानाची माहिती ७२ तासात विमा कंपनीस कळवा

**दैनिक यशसिद्धी न्यूज नेटववर्क**

सोलापूर/प्रतिनिधीः जिल्ह्यात दि. २८ ऑगस्ट ते दि. २ सप्टेंबर २०२४ या कालावधीत मोठ्या प्रमाणात पाऊस सूरू असून अजुन पुढील काही दिवस पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. पाऊसामुळे विमा संरक्षित क्षेत्र जलमय होऊन पिकाचे नुकसान झालेले असल्यास विमा संरक्षित क्षेत्राला नुकसान भरपाई मिळणेसाठी झालेल्या नुकसानीची पुर्वसुचना संबंधीत विमा कंपनीस ७२ तासामध्ये कळवावीअसे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दत्तात्रय गावसाने यांनी केले आहे. जिल्ह्यामध्ये प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप २०२४ या हंगामाकरीता अधिसुचीत क्षेत्रातील अधिसुचीत पिकांसाठी राबविण्यात येत आहे. जिल्ह्यासाठी खरीप २०२४ मध्ये ओरियंटल इन्सुरन्स कंपनी लिमिटेड या विमा कंपनीची नियुक्ती करण्यात आलेली आहे. पिक विमा योजनेतर्गत खरीप २०२४ मध्ये जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला आहे

प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत शेती क्षेत्राचे नुकसान झाल्यास विमा कंपनीकडे नुकसान भरपाई दावा दाखल करता येतो. विमा दावा मंजूर होण्यासाठी झालेल्या पीक नुकसानीची माहिती, पुर्वसुचना कंपनीस देणे गरजेचे आहे.

नुकसानीबाबतची सुचना पिक विमा कंपनीकडे नोंद करण्यासाठी पिक विमा प अथवा कृषि रक्षक पोर्टल टोल फ्री क्रमांक १४४४७ या क्रमांकाचा वापर करावा. तसेच या क्रमांकाबाबत काही तांत्रिक अडचण आल्यास सदर आपत्तीची माहिती विमा कंपनीचे तालुका स्तरावरील प्रतिनिधी, बँक कृषि व महसुल विभाग यांना द्यावी असे आवाहनही जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दत्तात्रय गावसाने यांनी केले आहे.

# ओबीसी महाएल्गार मेळाव्यांचे आयोजन



**दैनिक यशसिद्धी न्यूज नेटववर्क**

औसा/अमर जाधव :आज लातूर येथे ओबीसी, व्हीजेएनटी, एस.बी.सी महाएल्गार जिल्हास्तरीय मेळाव्या आयोजन संदर्भात आयोजित सवांद बैठक ओबीसी नेते श्री नवनाथजी वाघमारे, माजी महापौर विक्रांतजी गोजमगुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात पार पडली. या बैठकीत प्रारंभी औसा येथे आणि लवकरच विधानसभा निहाय व जिल्हास्तरीय ओबीसी महाएल्गार मेळावा राज्यातील सर्व प्रमुख ओबीसी नेत्यांच्या उपस्थातीत आयोजन करण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली.याप्रसंगी ओबीसी आरक्षण बचाव कृती समितीचे जिल्हा समन्वयक ड गोपाळजी बुरबुरे, रघुनाथजी मदने, आयुबजी मणियार, प्रा सुभाषजी भिंगे हरिभाऊजी गायकवाड, प्रा संतोषजी वीरकर, राजेंद्रजी वनारसे, पद्माकरजी वाघमारे, सुधीरजी पोतदार, नरसिंहजी भिकाने, विजयकुमारजी पिनाटे, भारतजी काळे, श्रीकांतजी मुद्दे, सुदर्शनजी बोराडे, कृष्णा पांचाळ विष्णूजी बानापुरे, डॉ एच जी निंबाळकरजी, अनिलजी जाधव, श्यामजी गोरे, रामजी कांबळे, ड नितीनजी म्हेत्रे, कालिदासजी माळी, सुधाकरजी माळी, दगडूसाहेब पडिले, संजयजी क्षीरसागर, ड बालाजी गाडेकर, पांडुरंगजी माळी, हनुमंतजी कांबळे, सुधाकरजी लोकरे, चांगदेवजी माळी, विनोदजी कुंभार, योगेशजी लदूरे, सतीशजी काप्रे, पांडुरंगजी बनसोडे, उद्धवजी काळे, भागवतजी चिंते, विशालजी वाघमारे युवराजजी चव्हाण, सचिनजी माळी, ज्ञानोबाजी मोगले ,शिवाजी पेठे, प्रल्हादजी गड्डीमे, भागवतजी वंगे, शिवाजी कुंभार, ड दत्ताजी घोगरे, विष्णूजी कोळी, रणधीरजी हाके, विष्णुजी पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.